<u>नियमित दिवाणी दावा क्र.३४४/२०१७ – निशाणी ३४ लगत आदेश</u>

विठ्ठल भिमू शेंडगे वि. चंद्रकांत किसन आलदर इ.

CNR NO. MHSO20–001166–2017

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी तर्फे त्यांचे विरुध्द झालेला 'नो क्रॉस' चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे, सदरकामी वादीचा जादा पुराव्यासाठी तारीख नेमलेली असून मागील तारखेस प्रतिवादी यांचे विरुध्द नो क्रॉस चा आदेश झालेला आहे. तरी सदरचा आदेश सेट असाईड करुन घेणेस पुढील मुदत मिळावी व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. सदरील अर्जास वादी तर्फे म्हणणे मांडले की, प्रतिवादी यांनी सदरहू अर्जामध्ये उलटतपास रद्द करण्याबाबत कोणत्याही प्रकारचे कारण हे नमूद केलेले नाही. तसेच यापूर्वी प्रतिवादी यांना ब–याच वेळा संधी दिली आहे. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर केल्यास वादीस खर्च देण्याचे हुकूम व्हावेत.

३. दोन्ही पक्षांतर्फे युक्तिवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा निरंतरचे ताकीदीचा दाखल केलेला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांना वादीची उलटतपास घेण्याची संधी देवूनही त्यांनी मुदतीत वादीचे उलटतपास न घेतलेमुळे त्यांचे विरुध्द "नो क्रॉस" आदेश झालेला आहे. सदर प्रतिवादीचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता प्रतिवादी यांना वादीचे उलट तपास घेण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी "नो क्रॉस" आदेश रद्द होऊन मिळणेचा अर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

१. प्रतिवादींचा अर्ज (नि.क्र.३४) त्यांनी वादी यांना रक्कम रू.३००/– देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी विरुध्द झालेला "नो क्रॉस" चा आदेश रद्द करण्यात येत आहे. प्रतिवादी यांना वादीचा उलट तपास घेण्यास परवानगी देणेत येते.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2025.08.22 11:54:07 +0530

दिनांक – १८/०८/२०२५

(श्रीमती पी. आर. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.

## ***CERTIFICATE***

| | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this PDF file Judgment / order are same word for word, as per original order. | | |
| Name of the Stenographer | : | S. S. Patne |
| Name of the Court | : | C.J.J.D. and J.M.F.C. Court, Sangola |
| Dated | : | 22/08/2025 |
| Order uploaded on | : | 22/08/2025 |